संदर्भ क्र.____________ दिनांक : ०७/०७/२०१४

# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संपाला 'धर्मराज्य पक्षा'चा जाहीर पाठिंबा

**प्रतिनिधी**

दि. ७ — महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेच्या(मॅग्मो) संपाला 'धर्मराज्य पक्षा'चा पाठिंबा असल्याचे 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी जाहीर केले आहे.

महाराष्ट्रातील १२ हजार राजपत्रित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी १ जुलैपासून बेमुदत संप पुकारला आहे. महाराष्ट्र सरकारने लेखी आश्वासन देऊनही वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रास्त मागण्यांची दखल न घेऊन त्यांची फसवणूक केली आहे. यामुळेच संपाचे हत्यार वैद्यकीय अधिकाऱ्यांना उचलावे लागले आहे. या संपामुळे शल्यविच्छेदनाच्या कामावर परिणाम झाला आहे आणि याचा रूग्णांनाही फटका बसला आहे. पण याला काही इलाज नाही. यासाठी शासनाने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मागण्या तत्काळ मान्य करणे हाच पर्याय आहे. याऐवजी 'मेस्मा' अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांवर होणारी कारवाई अन्यायपूर्ण आहे. धर्मराज्य पक्ष वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाजुने सक्रीयपणे उभा आहे आणि सामाजिक बांधिलकीपोटी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संपाला पाठिंबा देत असल्याच लेखी पत्र महाराष्ट्र राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजेश गायकवाड यांना भेटून दिल्याची माहिती राजन राजे यांनी दिली आहे.